राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०२५ परीक्षा दिनांक ०२ मे, २०२६.

2025

Q22

BOOKLET NO.
152116

कायदा
Law
Paper – I

Time Allowed : Three Hours | **Maximum Marks : 250**

Medium : Marathi / English | **Type of Paper : Conventional / Descriptive**

प्रश्नपत्रिकेसंबंधी विशेष सूचना

प्रश्नांची उत्तरे लिहिण्यापूर्वी खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :

1. **प्रश्नपत्रिकेत एकूण 8 प्रश्न असून दोन विभागात विभागलेले आहेत. त्यापैकी 5 प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.**
2. **प्रश्न क्रमांक 1 व प्रश्न क्रमांक 5 अनिवार्य आहेत. उर्वरित प्रश्नांपैकी 3 प्रश्न सोडविणे अनिवार्य असून त्यापैकी प्रत्येक विभागातील किमान 1 प्रश्न सोडविणे आवश्यक राहील.**
3. प्रत्येक प्रश्न/उप-प्रश्नांचे गुण त्याच्या समोर दर्शविण्यात आले आहेत.
4. अर्जात दावा केल्यानुसार व प्रवेशपत्रात दर्शविल्यानुसार उत्तरपुस्तिकेवर उत्तराचे माध्यम नमूद करावे. अधिकृत माध्यमाव्यतिरिक्त इतर माध्यमात लिहिलेले उत्तर तपासले जाणार नाहीत व त्यांना गुण दिले जाणार नाहीत.
5. जेथे पर्याय दिलेले असतील तेथे अनुक्रमाने प्रथम सोडविलेल्या पर्यायांचे आवश्यक संख्येइतक्याच प्रतिसादांचे केवळ मूल्यांकन केले जाईल. एखादे उत्तर काट मारल्याशिवाय अंशत: सोडविले असल्यास ते मोजण्यात येईल. अतिरिक्त प्रतिसादांचे मूल्यांकन केले जाणार नाही आणि त्याकडे दुर्लक्ष केले जाईल.
6. उमेदवारांनी प्रश्नाच्या सर्व उप-प्रश्नांची एकत्रित उत्तरे सोडविणे अपेक्षित आहे. जर एखाद्या प्रश्नाचा उप-प्रश्न इतरत्र सोडविल्यास, (काही पृष्ठ सोडल्यानंतर किंवा दुसऱ्या इतर प्रश्नाचा प्रयत्न केल्यानंतर) अशा प्रकरणी नंतरचे उप-प्रश्न मुल्यांकनासाठी दुर्लक्षित केले जातील.
7. प्रश्नात शब्द मर्यादा दर्शविलेली असल्यास ती लक्षात घ्या.
8. उत्तर पुस्तिकेतील कोणतेही पान किंवा पानाचा भाग रिकामा अथवा कोरा ठेवला असेल तर ते स्पष्टपणे रद्द करणे/काट मारणे आवश्यक आहे.
9. अन्यथा नमूद केलेले नसेल तर सांकेतिक चिन्ह, मानके यांना नेहमीचा प्रमाणित अर्थ असेल. आवश्यक असल्यास योग्य विदा (Data) गृहित धरा व तसे स्पष्टपणे नमूद करा.
10. आवश्यक असेल तेथे नकाशा/आकृतीचे रेखांकन स्पष्ट असणे आवश्यक राहील.

Question Paper Specific Instructions

Please read each of the following instructions carefully before attempting questions :

1. **There are EIGHT questions divided in two Sections, out of which FIVE are to be attempted.**
2. **Question No. 1 and 5 are compulsory. Out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.**
3. The number of marks carried by a question/sub-question is indicated against it.
4. The medium of answer should be mentioned on the answer book as claimed in the application and printed on admission card. The answers written in medium other than the authorized medium will not be assessed and no marks will be assigned to them.
5. Wherever option has been given, only the required number of responses in the serial order attempted shall be assessed. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Excess responses shall not be assessed and shall be ignored.
6. Candidates are expected to answer all the sub-questions of a question together. If sub-question of a question is attempted elsewhere (after leaving a few page or after attempting another question) the later sub-question shall be overlooked.
7. Keep in mind the word limit indicated in the question if any.
8. Any page or portion of the page left blank in the Answer Booklet must be clearly struck off.
9. Unless otherwise mentioned, symbol and notation have their usual standard meanings. Assume suitable data, if necessary and indicate the same clearly.
10. Neat sketches may be drawn, wherever required.

P.T.O.

विभाग – अ/SECTION – A

Q1. खालील **प्रत्येकावर** अंदाजे १५० शब्दांत लिहा. **(5×10=50)**

Write on the following in about **150** words **each**.

Q1. (a) भारतीय राज्यघटनेची विशिष्ट वैशिष्ट्ये स्पष्ट करा. **10**

Elaborate the distinctive features of the Constitution of India.

Q1. (b) जनहित याचिकांनी बजावलेल्या भूमिकेवर टिप्पणी करा. **10**

Comment on the role played by Public Interest Litigation.

Q1. (c) मूलभूत हक्क, राज्याच्या धोरणांची निर्देशक तत्वे आणि मूलभूत कर्तव्ये यातील संबंध स्पष्ट करा. **10**

Point out the relations between Fundamental Rights, Directive Principles of State Policy and Fundamental Duties.

Q1. (d) ''भारताचे राष्ट्रपती हे कमी–अधिक प्रमाणात कार्यकारी मंडळाचे नाममात्र प्रमुख आहेत आणि मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार वागण्यास बांधील आहेत.'' – हे वाक्य स्पष्ट करा. **10**

"The President of India is more or less a titular head of the executive and is bound by the advice of Council of Ministers." – Elaborate this statement.

Q1. (e) ''राज्यातील राज्यपालांचे अधिकार आणि स्थान हे, काही फरकांसह, राष्ट्रपतींच्या अधिकारासारखेच असते.'' राज्यपालांचे अधिकार स्पष्ट करा. **10**

"The power and position of the Governor in the State are, with a few differences, analogous to those of the President." Explain the powers of Governor.

Q2. (a) i) भारताच्या सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशांची नियुक्ती कशी होते, ते स्पष्ट करा. **10**

Explain the appointment of Judges in the Supreme Court of India.

ii) उच्च न्यायालयाच्या रिट अधिकारक्षेत्राची व्याप्ती आणि त्याचे विविध प्रकार स्पष्ट करा. **10**

Comment on the scope of writ jurisdiction of the High Courts and explain the different units.

Q2. (b) संघराज्य आणि राज्यातील कायदेविषयक अधिकारांचे वाटप कसे केले जाते ? **15**

How the legislative powers between the Union and the States are distributed ?

Q2. (c) संघ, राज्ये आणि स्थानिक संस्था मधील प्रशासकीय संबंधावर भाष्य करा. **15**

Comment on the administrative relationship among Union, States and Local Bodies.

Q3. (a) लोकसभेचे कायदेविषयक अधिकार आणि त्यांचे विशेषाधिकार आणि उन्मुक्ती स्पष्ट करा. **20**
Explain the legislative powers of the Lok Sabha and its privileges and immunities.

Q3. (b) निवडणूक आयोगाचे अधिकार आणि कार्यांवर भाष्य करा. **15**
Comment on the powers and functions of Election Commission.

Q3. (c) भारतीय राज्यघटनेतील आणिबाणी तरतुदींचे सविस्तर वर्णन करा. **15**
Describe in detail the emergency provisions under the Constitution of India.

Q4. (a) i) नैसर्गिक न्याय तत्वांबाबत उदयोन्मुख धोरण आणि न्यायिक दृष्टिकोण यावर टीप लिहा. **10**
Write a note on emerging trends and judicial approach of principles of Natural Justice.

ii) प्रत्यायोजित विधिविधान म्हणजे काय आणि ते घटनात्मक दृष्ट्या योग्य आहे का ? **10**
What is delegated legislation and whether it is constitutionally correct ?

Q4. (b) प्रशासकीय कार्यवाईचे न्यायिक पुनरावलोकन कसे केले जाते ? **15**
How judicial review of administrative action is made ?

Q4. (c) भारतात लोकपालाचे महत्व आणि कार्य स्पष्ट करा. **15**
Explain the importance and functions of Lokpal in India.

विभाग – ब/SECTION – B

Q5. खालील **प्रत्येकावर** अंदाजे १५० शब्दांत लिहा. **(5×10=50)**
Write on the following in about **150** words **each**.

Q5. (a) व्याख्यांच्या मदतीने आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप स्पष्ट करा. **10**
Explain the nature of international law with the help of definitions.

Q5. (b) आंतरराष्ट्रीय कायदा आणि नगरपालिका कायदा यांच्यातील संबंध स्पष्ट करा. **10**
Elaborate the relationship between International law and Municipal law.

Q5. (c) राज्य मान्यता आणि राज्य उत्तराधिकार म्हणजे काय ? **10**
What is State recognition and State succession ?

Q5. (d) समुद्राशी संबंधित कायदा सविस्तरपणे स्पष्ट करा. **10**
Explain the law related to sea in detail.

Q5. (e) राष्ट्रीयत्व आणि राज्यहीनता स्पष्ट करा. **10**
Explain nationality and statelessness.

Q6. (a) i) प्रत्यार्पण आणि आश्रय या संकल्पनेचे तपशीलवार स्पष्टीकरण द्या. **10**
Describe in detail the concept of extradition and asylum.

ii) करार संबंधी तपशीलवार लिहा. **10**
Write a detailed note on treaties.

Q6. (b) संयुक्त राष्ट्रे, त्याची रचना, कार्य, अधिकार आणि आवश्यक सुधारणा याबाबत वर्णन करा. **15**
Describe the United Nations, its organs/composition, functions, powers and reforms necessary.

Q6. (c) शांततापूर्ण रीतीने वाद सोडविण्याचे वेगवेगळे मार्ग कोणते आहेत ? **15**
What are different modes of peaceful settlement of disputes ?

Q7. (a) i) कायदेशीर बळजबरी, आक्रमकता, स्वसंरक्षण, हस्तक्षेप स्पष्ट करा. **10**
Explain lawful recourse to force, aggression, self-defence, intervention.

ii) आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्याची मूलभूत तत्वे आणि आंतरराष्ट्रीय अधिवेशने काय आहेत ? **10**
What are the fundamental principles of international humanitarian law and international conventions ?

Q7. (b) अण्वस्त्रांच्या चाचणीवरील बंदी आणि अण्वस्त्र प्रसारबंदी करार स्पष्ट करा. **15**
Explain the ban on testing of nuclear weapons and nuclear non-proliferation treaty.

Q7. (c) आंतरराष्ट्रीय दहशतवाद, राज्य-पुरस्कृत दहशतवाद यावर तपशीलवार लिहा. **15**
Write in detail on the international terrorism, State-sponsored terrorism.

Q8. (a) i) अपहरणाची संकल्पना स्पष्ट करा. **10**
Elaborate the concept of hijacking.

ii) आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाबद्दल सविस्तरपणे स्पष्ट करा. **10**
Explain in detail about International Criminal Court.

Q8. (b) नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेवर टिप्पणी करा. **15**
Comment on new international economic order.

Q8. (c) मानवी पर्यावरण म्हणजे काय आणि त्याचे संरक्षण आणि सुधारणा कश्या करायच्या ? **15**
What is human environment and how to protect and improve it ?